# ७. प्रक्रिया सहकारी संस्था
(Processing Co-operative Society)


| | |
|---|---|
| ७.१ प्रस्तावना | ७.५ सहकारी प्रक्रिया उद्योग |
| ७.२ अर्थ व व्याख्या | ७.६ सारांश |
| ७.३ वैशिष्ट्ये | ७.७ महत्त्वाच्या संज्ञा |
| ७.४ कार्ये | ७.८ स्वाध्याय |


## ७.१ प्रस्तावना : (Introduction)

भारत हा कृषी प्रधान देश असल्यामुळे कृषी क्षेत्राच्या विकासावर आर्थिक विकास अवलंबून असतो. त्या दृष्टीने शेतमालाला योग्य किंमत व बाजारपेठ मिळवून देणे ही महत्त्वाची बाब आहे. शेतमाल मूळ स्वरूपात विकल्यास त्यास योग्य किंमत मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्याला अपेक्षेप्रमाणे आर्थिक फायदा होत नव्हता. याउलट दलाल, व्यापारी व व्यावसायिक शेतमालाची खरेदी करून त्यावर कांही प्रक्रिया करून तो माल जास्त किंमतीला विकून भरपूर फायदा मिळवित होते. उपभोक्ता व शेतकरी या दोघांचीही पिळवणूक व फसवणूक होत असल्याचे दिसून आले. ही परिस्थिती बदलण्याच्या प्रेरणेतून सहकारी प्रक्रिया संस्थांचा उगम झाला.

## ७.२ प्रक्रिया संस्थेचा अर्थ व व्याख्या : (Meaning and Definition)

### अर्थ

शेतीमध्ये उत्पादित केलेला सर्वच माल ग्राहकांना लगेच उपयोगात आणता येत नाही. काही शेतमालावर तो माल ग्राहकांच्या हाती पडण्यापूर्वी विशिष्ट प्रक्रिया करणे आवश्यक असते. उदा.ऊसापासून गुळ व साखर बनविणे, कापूस पिंजून त्याचे गठ्ठे बनविणे, कापसापासून सूत तयार करून नंतर कापड तयार करणे, तेल बियांपासून खाद्यतेल निर्मिती करणे, फळांचे रस काढणे, खोबऱ्यापासून तेल काढणे, चहा, कॉफी इ.वर प्रक्रिया करून त्या ग्राहकांना उपभोग्य बनविण्याचे कार्य सहकारी प्रक्रिया संस्था करतात.

### व्याख्या

१) **‘‘ग्राहकांना अंतिम समाधान देण्याच्या दृष्टीने अन्नधान्य व इतर व्यापारी पिकांवर आवश्यक त्या प्रक्रिया करून ते ग्राहकांच्या उपयोगात आणण्याच्या उद्देशाने सहकारी तत्त्वावर स्थापन झालेल्या संस्थांना प्रक्रिया सहकारी संस्था म्हणतात.’’**

२) **महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६०–‘‘मालावर प्रक्रिया करणे हा ज्या संस्थेचा मुख्य उद्देश असतो ती संस्था म्हणजे प्रक्रिया सहकारी संस्था होय.’’**

## ७.३ प्रक्रिया संस्थेची वैशिष्ट्ये : ( Features of Processing Co-operative Society)




१) **ऐच्छिक संघटन :** सहकारी प्रक्रिया संस्था ही शेतकरी सभासदांनी स्वेच्छेने एकत्र येऊन स्थापन केलेली संस्था आहे. सभासदत्व स्वीकारणे किंवा त्याचा त्याग करणे हा निर्णय शेतकरी स्वत:च्या इच्छेनुसार घेत असतात. त्याबाबत त्यांच्यावर कोणतीही सक्ती केली जात नाही.

२) **भांडवल उभारणी :** प्रक्रिया सहकारी संस्थेच्या भांडवलाची उभारणी परिसरातील शेतमाल उत्पादक व शेतकऱ्यांना भागांच्या विक्रीव्दारे करण्यात येते. भाग भांडवल उभारणीत राज्य शासनाचा सहभाग असतो. राज्य शासनाच्या हमीवर सहकारी बँका भांडवली खर्चाच्या उभारणीसाठी दीर्घकालीन कर्ज उपलब्ध करून देतात.

३) **लोकशाही व्यवस्थापन :** सहकारी प्रक्रिया संस्थेचा कारभार लोकशाही पद्धतीने करण्यात येतो. दैनंदिन व्यवस्थापनासाठी सभासद संचालक मंडळाची/व्यवस्थापन समितीची निवड करतात. संस्थेच्या व्यवहारासंबंधीचे सर्व निर्णय सभासदांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत घेतले जातात.

४) **जोड व्यवसायांचा विकास :** सहकारी प्रक्रिया उद्योग आपल्या सभासदांना शेतीशी संलग्न व्यवसाय हाती घेण्यास प्रोत्साहन देतात. त्यासाठी लागणारे भांडवल संस्था उपलब्ध करून देते. त्यामुळे प्रक्रिया संस्थांच्या कार्यक्षेत्रात दुग्ध व्यवसाय, भाजीपाला लागवड, कुक्कुटपालन इ. जोड व्यवसाय विकसित होतात. त्यामुळे ग्रामीण भागात रोजगाराची संधी उपलब्ध होते आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भर पडते व शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावते.

५) **प्रक्रिया क्षेत्राचा विकास :** शेतमालाची शेतकऱ्यांच्या उत्पादन स्थळापासून प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतूक करण्यासाठी वाहतूकीची सुविधा संस्थेमार्फत उपलब्ध करून दिली जाते. कार्यक्षम वाहतुकीसाठी पक्के रस्ते, वीज, पाणी, टपाल कार्यालये, शाळा, दवाखाने अशा अनुषंगिक सेवा प्रक्रिया संस्था ज्या क्षेत्रात कार्य करतात त्या ठिकाणी उपलब्ध करून देतात. त्यामुळे सहकारी प्रक्रिया संस्थांच्या कार्यक्षेत्राचा विकास होतो.

६) **शेतमाल उत्पादन परिसरात स्थापना :** शेतमाल उत्पादित केल्यानंतर त्याची वाहतूक करणे, साठवणूक करणे अशी महत्वाची कार्ये संस्थेलाच करावी लागतात. त्यामुळे प्रक्रिया संस्थांची स्थापना उत्पादन परिसरातच केली जाते. प्रक्रिया करण्यासाठी आसपासच्या परिसरातून कच्चा शेतमाल मिळविणे, मालाचे एकत्रीकरण करणे सुलभ होते. उत्पादित मालाच्या प्रक्रियेसाठी लागणारा वेळ व वाहतूक खर्च यांची बचत होते. उदा. ऊस उत्पादक क्षेत्रामध्ये सहकारी साखर कारखाने स्थापन केले जातात.

७) **सहकार प्रशिक्षण व मार्गदर्शन :** शेतकरी वर्गाचे सर्व दृष्टीने कल्याण व्हावे यासाठी प्रक्रिया सहकारी संस्था प्रयत्नशील असतात. त्यासाठी संस्थेमार्फत सभासदांना शासकीय योजना, उद्योग विकास प्रशिक्षण, मालाच्या विक्रीसाठी बाजारपेठ मिळविणे, नवीन तंत्राचा वापर इ. बाबतीत शिक्षण, प्रशिक्षण व मार्गदर्शन केले जाते. असे मार्गदर्शन सभासदांना अत्यंत उपयुक्त ठरते.

८) **उत्पादक सभासदांना सेवा सुविधा :** प्रक्रिया संस्थेच्या स्थापनेसाठी लागणारे भांडवल उत्पादक सभासदांकडून गोळा करण्यात येते. नाशवंत शेतमालावर प्रक्रिया करण्यात आल्याने त्यांचे मूल्य संवर्धन होत असते. उत्पादित मालाच्या विक्रीसाठी उत्पादन आणि बाजारपेठेची सांगड घातली जाते. उत्पादक शेतकऱ्यांना शेतमालाच्या उत्पादनासाठी मार्गदर्शन व मालाच्या तारणावर कर्ज उपलब्ध करून देते. त्यामुळे शेतीच्या विकासाला चालना मिळते.

९) **ग्रामीण औद्योगिकीकरणास चालना :** ग्रामीण भागात स्थानिक पातळीवर सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, तेलबिया प्रक्रिया उद्योग इ.स्थापन करण्यात आल्याने ग्रामीण औद्योगिकीकरणास चालना मिळते. शासनाने सहकारी तत्त्वावर कार्य करणाऱ्या प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन दिले आहे. ग्रामीण भागाचे औद्योगिकीकरण झाल्याने अतिरिक्त श्रमशक्ती या उद्योगात सामावून घेता येते. त्यामुळे ग्रामीण दारिद्र्य व बेरोजगाराची तीव्रता कमी करण्यास साहाय्य होते.

१०) **रोजगाराच्या संधी :** शेतमालावर प्रक्रिया केल्यानंतर अनुषंगिक कार्ये करावी लागतात. उदा. प्रमाणीकरण, प्रतवारी, मालाची साठवणूक, वाहतूक, विक्री व्यवस्था इ.कार्य पूर्ण करण्यासाठी मोठया प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता असते. परिणामी बेरोजगारांना रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होतात.

११) **मध्यस्थांचे उच्चाटन :** सहकारी प्रक्रिया संस्था त्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाची खरेदी थेट उत्पादक शेतकऱ्यांकडून करतात. तसेच उत्पादित मालाची प्रत्यक्ष विक्री बाजारपेठेत करतात. त्यामुळे या व्यवहारात मध्यस्थांचा सहभाग नसतो. मालाच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारात मध्यस्थांचे उच्चाटन झाल्याने उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक व पिळवणूक थांबते. ग्राहकांना चांगल्या दर्जाच्या उत्पादित वस्तू रास्त दराने मिळतात.



**कृती–**

**१) तुमच्या परिसरातील प्रक्रिया कराव्या लागणाऱ्या शेती उत्पादनांची यादी तयार करा.**

## ७.४ प्रक्रिया सहकारी संस्थेची कार्ये : (Functions of Processing Co–operative Society)

१) **शेतमालाचे एकत्रीकरण :** सहकारी प्रक्रिया उद्योग विशिष्ट प्रकारच्या शेतमालावर प्रक्रिया करण्याचे कार्य करतात. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या कच्चा मालाचे उत्पादन उत्पादक सभासद करतात. त्यांच्या मार्फत उत्पादित मालाचे एकत्रीकरण किंवा संकलन करणे आणि त्याची उत्पादन केंद्रापर्यंत वाहतूक करणे ही कार्ये संस्था करते.

२) **शेतमालावर प्रक्रिया करणे :** सहकारी प्रक्रिया संस्थेचे मुख्य कार्य म्हणजे विशिष्ट प्रकारच्या शेतमालावर प्रक्रिया करणे आणि विशिष्ट गुणवत्ता असणाऱ्या मालाचे उत्पादन करणे हे असते. त्यामुळे मालाच्या गुणवत्तेत वाढ होते. परिणामी उत्पादित मालास चांगला भाव मिळतो आणि ग्राहकांना चांगला माल रास्त दरात उपलब्ध होतो.




३) **उत्पादित मालाची विक्री :** प्रक्रिया संस्थेव्दारे उत्पादित मालाची विक्री करण्यासाठी मालाचे प्रमाणीकरण, प्रतवारी, साठवण आणि वाहतुकीची व्यवस्था करणे, खुल्या बाजारपेठेत उत्पादित मालाची विक्री करणे अशी महत्त्वाची जबाबदारी संस्था पार पाडते. त्यामुळे सभासदांची माल विक्रीच्या अडचणीतून मुक्तता होऊन त्यांच्या उत्पादित मालास योग्य किंमत मिळते.

४) **शिक्षणाच्या सोयी :** सहकारी प्रक्रिया संस्थेच्या कार्यक्षेत्रात शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक शिक्षण, तंत्र शिक्षण संस्थांची स्थापना करून त्या भागातील जनतेस तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाच्या सोयी संस्थेमार्फत उपलब्ध करून दिल्या जातात. व्यावसायिक कौशल्य असणारे मनुष्यबळ प्रक्रिया उद्योगास स्थानिक पातळीवर उपलब्ध करून दिले जाते. त्या भागातील जनतेस रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर सामाजिक विकासाला हातभार लागतो.

५) **पीक संरक्षणाबाबत मार्गदर्शन :** प्रक्रिया संस्थेचे कार्य हे शेतीमालाच्या उत्पादनावर अवलंबून असते. पिकांचे वेगवेगळ्या कारणाने होणाऱ्या नुकसानीपासून संरक्षण कसे करावे, पिकांना कीड लागू नये, उत्पादकतेवर परिणाम होऊ नये तसेच पिकांच्या लागवडी बाबतही सभासदांना संस्थांकडून मार्गदर्शन केले जाते.

६) **बी-बियाणे,खते पुरविणे :** शेती उत्पादनांची गुणवत्ता व उपयोगिता वाढविण्यासाठी, अधिक पीक येण्यासाठी उत्तम प्रतीचे बी-बियाणे व रासायनिक खते इ.वस्तूंचा पुरवठा कमी किंमतीत सभासदांना पुरविण्याचे कार्य प्रक्रिया संस्थेमार्फत केले जाते.

७) **उप-उत्पादनाच्या विकासाला चालना :** सहकारी प्रक्रिया संस्थेमुळे उप-उत्पादनाच्या विकासाला चालना मिळते. उदा. कापसावर प्रक्रिया करून सरकीपासून खाद्यतेल, मळीपासून अल्कोहोल निर्मिती, ऊसाच्या चिपाडापासून कागद निर्मिती केली जाते.

८) **शेतमालाच्या उत्पादनासाठी कर्जपुरवठा :** शेतमालाच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या पैशाचा प्रश्न संस्थेमार्फत सोडविला जातो. शेतमालाच्या तारणावर किंवा मालाच्या विक्रीमधून कर्ज वसूली केली जात असल्यामुळे उत्पादकांना कर्ज फेडीची चिंता राहत नाही व कर्ज मिळविण्यासाठी सावकारांवर अवलंबून राहावे लागत नाही. असे महत्त्वाचे कार्य प्रक्रिया संस्था करतात.

९) **उत्पादन वाढीसाठी विकास योजना तयार करणे :** सहकारी प्रक्रिया संस्थेचे मुख्य कार्य म्हणजे उत्पादन वाढीसाठी अनेक योजना निर्माण करणे असते. या संस्थांचे यश कच्च्या मालाच्या म्हणजेच शेती मालाच्या उपलब्धतेवर अवलंबून असते. अधिक प्रमाणात कच्चा माल उपलब्ध होण्यासाठी तसेच उत्पादन वाढीसाठी प्रक्रिया क्षेत्रात विकासाच्या योजना हाती घेतल्या जातात व त्या योजनांच्या अंमलबजावणीकडे अधिक लक्ष दिले जाते.

१०) **मार्गदर्शन व प्रशिक्षण :** शेतमालाचे नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करणे तसेच पिकांच्या वाढीसाठी प्रयत्न करणे, त्यांचे मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण्याचे काम सहकारी प्रक्रिया संस्था करतात. त्यामुळे सभासद शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान समजते. बाजारपेठेतील स्पर्धेत टिकून राहणे, मालाला योग्य किंमत मिळवून देणे, ग्राहकांना उत्तम प्रतीचा माल योग्य किंमतीत पुरवठा करणे यासाठी प्रक्रिया संस्था प्रयत्न करते. सभासद शेतकऱ्यांना चांगले मार्गदर्शन मिळाल्यामुळे सभासदांचा आर्थिक आणि सामाजिक विकास होतो.

## ७.५ सहकारी प्रक्रिया उद्योग :

शेतमालावर प्रक्रिया करून त्याचे पक्क्या मालात रूपांतर करणाऱ्या व सहकार तत्त्वावर कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांना सहकारी प्रक्रिया संस्था असे म्हणतात. उदा. ऊसापासून साखर बनविणे, कापसापासून गासड्या व सूत बनविणे, तेलबियांपासून खाद्यतेल निर्मिती इत्यादी. शेतीमालावर प्रक्रिया करून विक्री केल्यास त्याचा शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळतो म्हणून सहकारी प्रक्रिया संस्थांची स्थापना करणे अत्यंत गरजेचे आहे.

भारतात सन १९१७ मध्ये म्हैसूर राज्यात पहिली कापूस पिंजणी संस्था स्थापन करण्यात आली. सन १९२१ मध्ये तशाच प्रकारची संस्था गुजरात राज्यात स्थापन झाली. भारतामध्ये सन १९५१ मध्ये पहिली सूत गिरणी सुरू करण्यात आली. त्यानंतरच्या काळात वेगवेगळ्या प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या.

अ) **सहकारी साखर कारखाने :** सहकारी साखर उद्योग हा प्रक्रिया उद्योगातील एक महत्त्वाचा सहकारी प्रक्रिया उद्योग आहे. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी फार मोठया प्रमाणावर मदत केली आहे. भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना रावबहादूर स्व. सी. व्ही. एस. नरसिंह राजू यांनी सन १९३३ मध्ये आंध्र प्रदेशातील 'इटिकोपक्का' येथे स्थापन केला. त्यावेळी त्याची गाळप क्षमता ७५ टन ऊस प्रति दिन एवढी होती. हा कारखाना आजही चांगल्या स्थितीत आहे. महाराष्ट्रात पहिला सहकारी साखर कारखाना अहमदनगर जिल्हयातील प्रवरानगर येथे सन १९५१ मध्ये पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या प्रयत्नाने सुरू झाला. आधुनिक प्रगत तंत्रज्ञानाच्या आधारे उभारलेला हा कारखाना आहे. भारतातील ३१६ साखर कारखान्यांपैकी १२२ सहकारी साखर कारखाने महाराष्ट्रात आहेत. या सहकारी प्रक्रिया उद्योगाचे भागधारक सभासद हे कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी असतात. तसेच प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांनाही सभासदत्व दिले जाते. भांडवल उभारणीत राज्य सरकारचा सहभाग असतो. या उद्योगात ऊसावर प्रक्रिया करून साखरेची निर्मिती केली जाते. साखर उत्पादनाबरोबरच साखर कारखान्यांनी उप उत्पादन निर्मिती प्रकल्प सुरू केलेले आहेत. उदा. मळी प्रकल्प, गॅस अल्कोहल निर्मिती, सहवीज निर्मिती प्रकल्प, इथेनॉल इंधन निर्मिती, पेपर पार्टिकल बोर्ड इ. ज्या ठिकाणी ऊसापासून साखर निर्माण करण्याच्या सोयी नसतात त्या ठिकाणी ऊसावर प्रक्रिया करून गूळ तयार केला जातो. गुळाला सुद्धा चांगली मागणी असते. त्यामुळे सहकारी पद्धतीने गूळ तयार करण्याचा उद्योग हाती घेता येतो. सहकारी साखर कारखान्यांचा मुख्य उद्देश सहकारी तत्त्वावर ऊसापासून साखर तयार करणे व उप उत्पादनासाठी कार्यशाळा स्थापन

करून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारणे हा आहे. सहकारी साखर कारखान्यांचे व्यवस्थापन संचालक मंडळाद्वारे पद्धतीने केले जाते. साखर कारखान्यांना शासन भाग भांडवलाच्या स्वरूपात भांडवल पुरविते. औद्योगिक आर्थिक विकास महामंडळ योजनेच्या खर्चाच्या ६० टक्के दीर्घमुदतीचे कर्ज देते.  केंद्र व राज्य सरकार ५०-५० टक्के कर्जाला हमी  देते. महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त सहकारी साखर कारखाने आहेत.



सहकारी साखर कारखाना



गूळ उत्पादन



कृती–

२) नजीकच्या सहकारी साखर कारखान्यास भेट देऊन कारखान्याच्या कामकाजाची माहिती गोळा करा.

**ब) सहकारी सूत गिरण्या –** कापूस या नगदी पिकावर प्रक्रिया करून कापडाच्या निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या सूताचे उत्पादन करणारी सहकारी प्रक्रिया संस्था म्हणजे सहकारी सूत गिरणी होय. सहकारी सूत गिरणी सहकारी प्रक्रिया संस्थामध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहेत. सहकारी चळवळीमध्ये साखर कारखान्यांइतकेच त्यांचे स्थान महत्त्वाचे असते. भारतात पहिली सूत गिरणी सन १९५१ मध्ये सुरू झाली. नियोजन काळात सूत गिरण्यांची संख्या मोठया प्रमाणावर वाढली. महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू या कापूस उत्पादन करणाऱ्या राज्यात प्रामुख्याने सहकारी सूत गिरण्या स्थापन करण्यात आल्या. शेतकऱ्याने उत्पादित केलेल्या कापसाचे पिंजण करणे, कापसाच्या गासड्या बांधणे, बांधलेल्या गासड्यांचे सूत तयार करणे ते सूत कापड गिरण्यांना विकणे इ.कार्य सूत गिरण्या करीत असतात. त्याशिवाय कापसाच्या सरकीपासून खाद्यतेल आणि पेंड तयार करण्याचा उद्योगही सहकार क्षेत्रात चालतो. सूतापासून तयार केलेल्या कापडाची निर्यात मोठ्या प्रमाणावर केली जाते.



सहकारी सूत गिरण्या

भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशाचा अनेक प्रकारच्या कापडाची निर्मिती करण्यात वरचा क्रमांक आहे. मलमल आणि प्रिंट असलेले कापड भारतात प्राचीन काळापासून तयार केले जाते. त्यासाठी लागणारा कापूस हा शेतीमधून उत्पादित होतो. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कापसाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी कापसावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची स्थापना करण्यावर भर दिला जातो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सरकारने देशातील हातमाग व यंत्रमागावरील कापड उत्पादनाला उत्तेजन देण्याचे धोरण स्वीकारले. त्यामुळे ग्रामीण भागातील असंख्य विणकरांना उपजिविकेचे

साधन उपलब्ध होऊ शकले. कापूस उत्पादकांना हमीभाव मिळावा म्हणून महाराष्ट्र शासनाने १९७२ साली कापूस खरेदीच्या संदर्भात 'कापूस एकाधिकार खरेदी योजना' सुरू केली. सरकीपासून तेल काढण्याचे कारखाने सुरू करण्यात आले आहेत. भारतातून परदेशात कापडाची निर्यात केली जाते. भारताच्या निर्यात व्यापारात कापड उद्योग सर्वोच्च स्थानी आहे.



**सहकारी सूत गिरणी**

भारतात पहिली सूत गिरणी आंध्र प्रदेशामध्ये विणकरांनी स्थापन केली आहे. कापूस उत्पादकांनी स्थापन केलेल्या सूत गिरण्या तसेच जिनिंग-प्रेसिंग सहकारी संस्था आपल्या सभासदासाठी सूताचे उत्पादन आणि पुरवठा करण्यासाठी विणकरांनी एकत्र येवून सूत गिरण्या स्थापन केल्या. महाराष्ट्रामध्ये गेल्या ५० वर्षात सहकारी सूत गिरण्यांनी उल्लेखनीय प्रगती केली आहे. महाराष्ट्रात मार्च २०१८ अखेर सूत गिरण्यांची संख्या ११६ असून कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ''महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ'' ही शिखर संस्था नागपूर येथे स्थापन केली आहे.

**क)** **दुग्ध सहकारी संस्था –** दुग्ध उत्पादक सहकारी संस्था या ग्रामीण भागात स्थापन होतात. दूध व्यवसायाशी निगडीत गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या इ.मुळे दुग्ध निर्मिती होते. दुधापासून पेढे, चीज, तूप, लोणी, दही, श्रीखंड इ.पदार्थ तयार केले जातात. याशिवाय शेण, लेंड्यांमुळे खत निर्मिती होते. काही दूध उत्पादक संघ दुधाची पावडर (भुकटी) तयार करतात. गुजरातमध्ये खेडा जिल्ह्यात सहकारी तत्त्वावर पहिला ''जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ'' स्थापन झाला. देशामध्ये राज्य पातळीवर २२ दूध संघ स्थापन झाले असून 'अमुल'(AMUL) या दूध संघाचे प्रमुख वर्गीस कुरीयन यांच्या सहकार्याने सन १९६५ मध्ये नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाची (NDDB) स्थापना करण्यात आली. या बोर्डामार्फत दुधाचा महापूर योजना सुरू करण्यात आली. महाराष्ट्रात दूध महापूर योजनेस चांगले यश मिळाले आहे.

दुग्ध उत्पादन हा शेतीला पूरक व्यवसाय आहे. दुधाचे संकलन, शीतकरण आणि विक्रीचे उपक्रमही हाती घेतले जातात. सभासदांना दुधाच्या गुणवत्तेच्या आधारे किंमत दिली जाते. सभासदांनी पुरविलेल्या दुधाच्या किंमतीच्या प्रमाणात नफ्याचे वाटप करण्यात येते. मार्च २०१८ अखेर महाराष्ट्रात १२६९० प्राथमिक दूधपुरवठा संस्था आणि ६३ मध्यवर्ती दूधपुरवठा संघ अस्तित्वात होते. महाराष्ट्र राज्य पातळीवर मुंबई येथे महाराष्ट्र राज्य दुग्ध सहकारी महासंघ (महानंद डेअरी) आहे. शासन व दुग्ध सहकारी संस्था यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य ही संस्था करते.










दुग्ध सहकारी संस्था

भारताने शेती क्षेत्रातील हरितक्रांती प्रमाणे दुग्ध व्यवसायात धवलक्रांती केलेली आहे. महाराष्ट्रात सहकारी संस्थांकडून जवळपास ८५% दुधाचे संकलन केले जाते. दुधाचे उत्पादन वाढवून प्रक्रिया करण्यासाठी 'दूध महापूर योजना' शासनाने अंमलात आणली आहे. दुधावर प्रक्रिया करून प्रक्रिया केलेल्या मालाची विक्री करण्याचे कार्य दुग्ध विकास सहकारी संस्था करतात. सभासदाने संस्थेशी एकनिष्ठ राहून आपले विक्रीयोग्य सर्व दूध संस्थेस पुरवावे अशी अपेक्षा असते.

शेतकरी सभासदांसाठी या संस्था दुभती जनावरे खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य करतात. त्यांना लागणारा चारा व सरकी पेंड अल्पदरात पुरवितात. महाराष्ट्र शासनाने ''गो पैदास'' कार्यक्रम राबविला असून धवलक्रांतीविषयक धोरण जाहीर केले आहे.

दुग्ध व्यवसाय हा शेती व्यवसायाला पुरक व्यवसाय आहे. ग्रामीण भागात अनेक लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे. हा व्यवसाय शेतीशी निगडीत आहे.

## ७.६ सारांश

शेतमालावर प्रक्रिया करून वापरण्यायोग्य शेतमाल ग्राहकांना उपलब्ध करणे, उत्पादकांना त्यांच्या शेतमालाचे योग्य मूल्य मिळवून देणे तसेच प्रक्रिया केलेल्या मालास योग्य बाजारपेठ मिळवून देण्याचे कार्य प्रक्रिया सहकारी संस्था करतात.

**व्याख्या –**

''मालावर प्रक्रिया करणे हा ज्या संस्थेचा मुख्य उद्देश असतो ती संस्था म्हणजे प्रक्रिया सहकारी संस्था होय.''

### ❑ प्रक्रिया सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये–

१) ऐच्छिक संघटन
२) भांडवल उभारणी
३) लोकशाही व्यवस्थापन
४) जोड व्यवसायांचा विकास
५) प्रक्रिया क्षेत्राचा विकास
६) शेतमाल उत्पादन परिसरात स्थापना
७) सहकार प्रशिक्षण व मार्गदर्शन
८) उत्पादक सभासदांना सेवा सुविधा
९) ग्रामीण औद्योगिकीकरणास चालना
१०) रोजगाराच्या संधी
११) मध्यस्थांचे उच्चाटन

### ❑ प्रक्रिया सहकारी संस्थेची कार्ये

१) शेतमालाचे एकत्रीकरण
२) शेतमालावर प्रक्रिया करणे
३) उत्पादित मालाची विक्री
४) शिक्षणाच्या सोयी
५) पीक संरक्षणाबाबत मार्गदर्शन
६) बी-बियाणे,खते पुरविणे
७) उप उत्पादनाच्या विकासाला चालना
८) शेतमालाच्या उत्पादनासाठी कर्जपुरवठा
९) उत्पादन वाढीसाठी विकास योजना तयार करणे
१०) मार्गदर्शन व प्रशिक्षण

**❑ सहकारी प्रक्रिया उद्योग**

अ) सहकारी साखर कारखाने

ब) सहकारी सूत गिरणी

क) दुग्ध सहकारी संस्था

वरील सर्व संस्थांचे ग्रामीण विकासासाठी, रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी सामाजिक विकासात महत्त्वाचे स्थान आहे.

## ७.७ महत्त्वाच्या संज्ञा

१) **कापूस एकाधिकार खरेदी योजना –** कापूस उत्पादकांना हमीभाव मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनाने सुरू केलेली योजना.

२) **उप–उत्पादन –** शेतमालावर प्रक्रिया केल्यावर जो माल शिल्लक राहतो त्या उप पदार्थाचा वापर करून नवीन वस्तू तयार करणे.

३) **जोड व्यवसाय –** शेतीबरोबर इतर व्यवसाय करणे.

४) **मध्यस्थांचे उच्चाटन –** खरेदी विक्री व्यवहारात मध्यस्थांचा (दलाल/एजंट/अडत्या) सहभाग नसणे.

५) **दूध महापूर योजना–** दुधाचे उत्पादन वाढवून प्रक्रिया करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सुरू केलेली योजना.

## ७.८ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

१) महाराष्ट्रात पहिला सहकारी साखर कारखाना ----- येथे स्थापन करण्यात आला.

अ) प्रवरानगर ब) पुणे क) सातारा

२) महाराष्ट्र राज्य दुग्ध सहकारी महासंघ ----- येथे आहे.

अ) पुणे ब) मुंबई क) कोल्हापूर

३) प्रक्रिया सहकारी संस्थेचे मुख्य कार्य ----- आहे.

अ) उत्पादन ब) विपणन क) प्रक्रिया

४) शेतमालावर प्रक्रिया केल्यामुळे मूळ उत्पादनाचे मूल्य -----

अ) कमी होते ब) वाढते क) स्थिर राहते

५) भारतात पहिली सूत गिरणी ----- साली स्थापन झाली.

अ) १९४९ ब) १९५० क) १९५१

**ब) योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| अ) पहिली कापूस पिंजणी संस्था | १) प्रवरानगर |
| ब) भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना | २) हरितक्रांती |
| क) दुग्ध सहकारी संस्था | ३) १९१७ |
| ड) महानंद डेअरी | ४) इटिकोपक्का |
| ई) प्रक्रिया उद्योग | ५) १८१७ |
| | ६) गृहनिर्माण सहकारी संस्था |
| | ७) दूध महापूर योजना |
| | ८) कोल्हापूर |
| | ९) ऊसापासून साखर तयार करणे |
| | १०) मुंबई |

**क) खालील विधानांसाठी एक शब्द / शब्दसमूह लिहा.**

१) साखर उत्पादनांसाठी आवश्यक असलेला कच्चा माल
२) दुधाचा दर्जा टिकविण्यासाठी आवश्यक असलेली एक सुविधा
३) कापूस उत्पादकांना हमीभाव मिळविण्यासाठी शासनाने सुरू केलेली योजना
४) दुग्ध व्यवसायात झालेली क्रांती

**ड) खालील विधाने चूक किंवा बरोबर ते लिहा.**

१) सहकारी प्रक्रिया संस्थेमुळे रोजगाराची संधी उपलब्ध होते.
२) कापसावर प्रक्रिया करण्याची गरज नसते.
३) प्रक्रियेनंतर मूळ पदार्थांची किंमत कमी होत जाते.
४) प्रक्रिया सहकारी संस्थेची पतपुरवठ्याशी सांगड घालून कर्जाची वसुली करता येते.
५) प्रक्रिया संस्थेचा कारभार हुकूमशाही पद्धतीने चालतो.

**इ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) प्रक्रिया संस्थेचे कार्य प्रामुख्याने .......... उत्पादनावर अवलंबून असते.
२) दुग्ध उत्पादक सहकारी संस्था विशेषतः ............. भागात स्थापन केल्या जातात.
३) भारतात .............. येथे पहिली कापूस पिंजणी संस्था स्थापन करण्यात आली.
४) सहकारी सूत गिरणी सहकारी प्रक्रिया संस्थांमध्ये .................. क्रमांकावर आहे.
५) सहकारी सूत गिरणीसाठी लागणारा कच्चा माल म्हणजे ............ होय.

## (फ) अचूक पर्याय निवडा.

| | |
|---|---|
| १) महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना | |
| २) दुग्ध व्यवसायातील क्रांती | |
| ३) | शेतीला पूरक व्यवसाय |
| ४) प्रक्रिया सहकारी संस्था | |

फळांचा रस काढणे, प्रवरानगर, दुग्ध व्यवसाय, हरितक्रांती, धवल क्रांती, इटिकोपक्का

## ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) प्रक्रिया सहकारी संस्था म्हणजे काय?

२) कापूस एकाधिकार खरेदी योजना म्हणजे काय?

३) उपउत्पादन म्हणजे काय?

४) साखर उत्पादनासाठी आवश्यक असलेला कच्चा माल कोणता?

## ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.

१) प्रक्रिया संस्थेचा कारभार हुकूमशाही पद्धतीने चालतो.

२) सहकारी सूत गिरणी ऊसावर प्रक्रिया करते.

३) प्रक्रिया सहकारी संस्थेचे मुख्य कार्य तयार मालावर प्रक्रिया करणे होय.

४) महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना पुणे येथे स्थापन झाला.

## ई) गटात न बसणारा शब्द शोधा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | अ) तेलबिया | ब) दूध | क) साखर | ड) कापूस |
| २) | अ) सूत गिरण्या | ब) शीतगृहे | क) साखर कारखाने | ड) तेल गिरण्या |
| ३) | अ) मळी | ब) अल्कोहोल | क) इथेनॉल | ड) सरकी |

## ज) योग्य क्रम लावा.

अ) सूत ब) गासड्या

क) कापड ड) कापूस पिंजणी

## प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.

१) दूध महापूर योजना

२) उप उत्पादन

३) जोड व्यवसाय

४) कापूस एकाधिकार खरेदी योजना

**प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.**

१) सहकारी प्रक्रिया संस्थेमुळे रोजगारात वाढ होते याबाबत आपले मत व्यक्त करा.

२) सहकारी प्रक्रिया संस्थेमुळे ग्रामीण विकासाला चालना मिळते यावर आपले विचार व्यक्त करा.

**प्र.४ फरक स्पष्ट करा.**

१) प्रक्रिया सहकारी संस्था आणि सेवा सहकारी संस्था

२) प्रक्रिया सहकारी संस्था आणि सहकारी पतपुरवठा संस्था

**प्र.५ टीपा लिहा.**

१) सहकारी साखर कारखाने

२) सहकारी सूत गिरण्या

३) सहकारी दुग्ध संस्था

४) प्रक्रिया सहकारी संस्था

**प्र.६ कारणे द्या.**

१) सहकारी साखर कारखान्यामुळे ग्रामीण विकासाला चालना मिळाली आहे.

२) सहकारी प्रक्रिया संस्थेमुळे ग्रामीण उद्योगात वाढ झाली आहे.

३) शेतमालावर प्रक्रिया केल्यास त्याला चांगली किंमत मिळते.

४) प्रक्रिया सहकारी संस्था उत्पादन क्षेत्राच्या परिसरात स्थापन करतात.

**प्र.७ खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.**

१) प्रक्रिया सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) प्रक्रिया सहकारी संस्थेची कार्ये स्पष्ट करा.

**प्र.८ दीर्घोतरी प्रश्न.**

१) प्रक्रिया सहकारी संस्थेची व्याख्या लिहून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) प्रक्रिया सहकारी संस्थेची कार्ये स्पष्ट करा.

◆◆◆